## प्रेस नोट

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०१.१०.२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १) डॉ.सचिन छगनआप्पा बोंद्रे, वय ४४ वर्षे, पद : सहा.पशु शल्य चिकीत्सक, पशु वैद्यकिय विभाग, महानगर पालिका, अमरावती, वर्ग – २<br>२) गुणसागर वासुदेव गवई, वय ५० वर्षे, पद : कनिष्ठ लिपीक (पशुधन निरीक्षक प्रभारी) महानगर पालिका, अमरावती, वर्ग ३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | दिनांक ०१.१०.२०२१ रो १५.५७ ते १७.३३ वा. दरम्यान |
| ४ | स्विकारलेला लाच रक्कम | ५०,०००/– रुपये |
| ५ | घटनास्थळ | पशु वैद्यकिय विभाग कार्यालय, महानगरपालीका, अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे महानगरपालिका, अमरावती येथे कार्यरत असुन त्यांना पशुवैद्यकिय विभागामध्ये शहराचे दैनंदिन कार्यवाही भटक्या व हिंसक श्वानांच्याबाबत उपाययोजना करणे इत्यादी कामावर निरीक्षक म्हणुन नेमण्यात आले आहे. आलोसे क्र.१) डॉ.सचिन बोंद्रे यांनी तक्रारदार यांनी पकडलेली डुकरे विक्री केल्याबाबत तसेच तक्रारदार हे कर्तव्यावर गैरहजर राहत असल्याचे सांगुन त्यांचेविरुध्द कार्यवाही करुन त्यांना कामावरुन काढुन न टाकण्याकरीता १,५०,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक १६.०९.२०२१ रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीचे अनुषगाने दिनांक १६.०९.२०२१ व ३०.०९.२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे क्र.१) डॉ.सचिन बोंद्रे यांनी तक्रारदार यांना त्यांचेवर कोणतीही कार्यवाही न करणेकरीता तडजोडीअंती १,००,०००/– रुपये लाचेची मागणी असल्याचे तसेच आलोसे क्र.२) गुणसागर गवई यांनी सदर लाच रक्कम आलोसे क्र.१) डॉ.सचिन बोंद्रे यांना देणेकरीता प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक ०१.१०.२०२१ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे क्र.१) डॉ.सचिन बोंद्रे यांनी मागणी केलेल्या १,००,०००/– रुपये लाच रकमेपैकी पहिला टप्पा ५०,०००/– रुपये स्विकारल्याने रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपीविरुध्द पो.स्टे. सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, श्री.एस.एस.भगत, पोलीस उपअधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पो.नि.संतोष इंगळे, पो.ना.सुनिल व–हाडे, युवराज राठोड, पो.कॉ.अभय वाघ, चालक पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली

नागरिकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,
टोल फ्रि नंबर – १०६४

(संतोष इंगळे)
पोलीस निरीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

oppo F9 pro ©clicked by santosh

Scanned with CamScanner